दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.१५ सप्टेंबर २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३६६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 15 September 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 366 ● Pages 4 ● Rate 4 Rs


### मुंबईसह कोकण, उत्तर महाराष्ट्राला अलर्ट

**मुंबई**–गणेशोत्सवाच्या उत्साहात राज्यातील अनेक भागांत पावसाने पुन्हा जोर धरला आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि कोकणासह महाराष्ट्राच्या विविध भागांत पावसाच्या सरी सुरू असून काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याचे चित्र आहे. गणेश मंडपांमध्येही पावसाचा फटका बसत आहे. मात्र, दुसरीकडे पावसाची प्रतीक्षा असलेल्या विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना या सरींमुळे काहीसा दिलासा मिळाला आहे.बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पावसासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. याचा परिणाम म्हणून कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाच्या सरी सुरू राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्याच्या विविध भागांत पाऊस, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटाचा अंदाज व्यक्त केला आहे.१४ आणि १५ सप्टेंबरदरम्यान महाराष्ट्रातील अनेक भागांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# मी मुंबईत एकटा येतोय ,फडणवीस परवानगी देणार का ?–जरांगे पाटील


## मराठा आंदोलकांना योग्यवेळी बोलावण्यात येईल

### ‘ही शेवटची झुंज आहे’

**मराठा आरक्षणासाठीची ही लढाई निर्णायक टप्प्यावर असल्याचे सांगत जरांगेंनी समाजाला संयम राखण्याचे आवाहन केले. एकाच दिवशी संपूर्ण ताकद खर्च करण्याऐवजी परिस्थितीनुसार डावपेच आखण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. ‘मी मागे हटलेलो नाही, तर तुमच्यासाठी पुढे चाललो आहे’, असा संदेश त्यांनी समर्थकांना दिला.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

मनोज जरांगे पाटील यांनी १५ सप्टेंबरला अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने रवाना होण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सकाळी ११ वाजता मुंबईकडे निघणार असल्याचे स्पष्ट केले. मात्र, यावेळी मोठ्या संख्येने मराठा बांधवांना सोबत न घेता आपण सुरुवातीला एकट्याने किंवा अत्यंत मोजक्या लोकांसह मुंबईकडे जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. मुंबई पोलिसांनी त्यांच्या प्रस्तावित आंदोलनाला परवानगी नाकारली असतानाही १५ सप्टेंबरचा प्रवास नियोजित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.जरांगे म्हणाले की, त्यांच्या ताफ्यात सुरुवातीला जास्तीत जास्त दोन गाड्या असतील. एखादी गाडी बंद पडल्यास दुसऱ्या गाडीतून प्रवास करता यावा, अशी व्यवस्था केली जाईल. त्यासोबत दोन रुग्णवाहिका ठेवण्यात येणार असून, एकूण चार वाहनांपेक्षा अधिक ताफा नसेल, असे त्यांनी सांगितले. आपल्यासोबत पाच ते दहा जणांपेक्षा अधिक लोक नसतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.मराठा समाजाने मोठ्या संख्येने मुंबईकडे जाण्यासाठी केलेली तयारी थांबवू नये, असे आवाहन करतानाच ती ताकद योग्यवेळी वापरण्याची गरज असल्याचे जरांगे यांनी सांगितले. गावागावातून जमा केलेल्या वर्गण्या आणि मुंबईकडे जाण्यासाठी तयार केलेल्या गाड्या जशाच्या तशा ठेवाव्यात, त्यातील पैसा सध्या खर्च करू नये, अशी सूचना त्यांनी केली. योग्य वेळी मराठा समाजाला मुंबईत बोलावले जाईल, असेही त्यांनी म्हटले.दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला मुंबई पोलिसांनी पुन्हा एकदा परवानगी नाकारली आहे. आझाद मैदानावर आंदोलनासाठी यापूर्वी परवानगी नाकारल्यानंतर जरांगे यांच्या वतीने नव्याने परवानगीचा अर्ज करण्यात आला होता. मात्र, या अर्जावरही पोलिसांनी नकार दिला आहे.




### ‘गाड्या आणि वर्गणी जशीच्या तशी ठेवा’

**गावागावातून मुंबईकडे जाण्यासाठी ज्या गाड्या निश्चित करण्यात आल्या आहेत, त्या रद्द करू नका, असे जरांगेंनी स्पष्ट केले. उलट काही गावांनी दोन गाड्या ठरवल्या असतील तर तीन, चार असतील तर सहा गाड्यांची तयारी करण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन त्यांनी केले. मात्र, या वाहनांचा आणि जमा झालेल्या निधीचा वापर सध्या करू नका, असेही त्यांनी सांगितले.**

## बीड–हडपसर रेल्वे सेवेचा ऐतिहासिक शुभारंभ, १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी होणार–खा.बजरंग सोनवणे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जनतेच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम मिळणार आहे.दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी बीड-हडपसर (पुणे) रेल्वेसेवेचा शुभारंभ होत आहे.बीड जिल्ह्याला पुण्याशी थेट रेल्वे सेवेने जोडणारा हा ऐतिहासिक आणि अभिमानाचा क्षण आहे.या रेल्वेमुळे विद्यार्थी,नोकरदार, व्यापारी,शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठी सुविधा मिळणार असून बीड जिल्ह्याच्या विकासाला नवी गती मिळणार आहे.अनेक वर्षांपासून बीडच्या जनतेने पाहिलेले रेल्वेचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होत आहे.बीडच्या विकासाच्या प्रवासा तील हा एक ऐतिहासिक टप्पा आहे.बीड जिल्ह्याच्या समस्त



जनतेला मनःपूर्वक शुभेच्छा असे खा.बजरंग बप्पा सोनवणे यांनी बीड जिल्ह्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## सावरलेल्या पुनर्वसित शेतकऱ्यांना पुन्हा उध्वस्त करण्याचा घाट थांबवा–दत्ता कांबळे

### माजलगाव धरण उंचीवाढीचा निर्णय तात्काळ थांबवण्याची मागणी; मुख्यमंत्र्यांना भेटणार

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । विजय डावरे**

माजलगाव धरणाच्या उंचीवाढीच्या सरकारी निर्णयामुळे पुनर्वसित शेतकरी पुन्हा उध्वस्त होण्याच्या मार्गावर असून, सावरलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा विस्थापित करू नये, अशी मागणी काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे बीड जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी केली आहे. धरणग्रस्तांनी यापूर्वीच जमीन व घरे गमावून अल्प मोबदल्यात आपला संसार उभा केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात न घेता धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय घेणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी म्हटले.

धरणाची उंची वाढविण्याऐवजी धरणातील गाळ काढून खोली वाढविल्यास अतिरिक्त पाणीसाठा करता येऊ शकतो. त्यामुळे सरकारने या पर्यायाचा गांभीर्याने विचार करून पुनर्वसित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी कांबळे यांनी केली. धरण उंचीवाढीचा निर्णय मागे न घेतल्यास संघर्ष युवा शेतकरी समिती व पुनर्वसित शेतकऱ्यांच्या वतीने जलसमाधी आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या प्रश्नावर लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार, बीड जिल्हाधिकारी व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती दत्ता कांबळे यांनी दिली. संघर्ष युवा शेतकरी समितीच्या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



## मोलगी येथील वाग देव,गांवदेवती पूजा उत्सव नियोजन सभा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी गावात बैल पोळ्यानंतर होणारा आदिवासी बांधवांचा रूढी परंपरागत वाग देव आणि गावदेवती पूजा उत्सव हा याच महिन्यात २६ सप्टेंबरला होणार असल्याने मोलगी गावातील प्रमुख लोकांची महत्त्व पूर्ण नियोजन बैठक नुकतीच संपन्न झाली.मोलगी गावाचा वाघ देव व गावदेवती पुजाउत्सव हा मोलगी परिसासाठी प्रसिद्ध उत्सव आहे.ही उत्सव पद्धती रुढी परंपराने चालत आली असून या वर्षीचा उत्सव दि.२६/०९/२०२६ रोजी असल्याने त्या साठीची नियोजन बैठक नुकतीच संपन्न झाली या बैठकीत मोलगी गावांतील बारा पाड्यातील ग्रामस्थ एकत्रीत होते त्यांनी गावदेवी देव पूजेच्या नियोजन बैठकित महत्वाचे निर्णय घेण्यात आले.आजची युवा पिढी व्यसनाधीन झाली असून रूढी परंपरागत पूजा पद्धती विसरत चालली आहे. म्हणून त्यांना या रुढीगत परंपरेचे ज्ञान मिळावे आपली संस्कृतीचे जतन त्यांनी करावे म्हणून



दरवर्षी प्रमाणे या वर्षीही मोठ्या संख्येने आदिवासी बांधवानी आपले सांस्कृतिक ढोल वाद्य आणतील असे आवाहन करण्यात आले.त्याच प्रमाणे हा पूजा उत्सव सामूहिक नियोजनाने होत असल्याचे त्या साठी लागणारे आर्थिक नियोजन लोकं वर्गणीतून होत असल्याने प्रत्येक कुटुंबाने ते वेळेवर जमा करण्याचेही आव्हान करण्यात आले. गांवदेवती पूजा उत्सव हा गावातील लोकांच्या सुख शांती आणि समृद्ध जीवना साठी केला जातो.आदिवासी बांधव हा जल जंगल जमीन आणि त्यातील पशू पक्षी प्राणी यांनाही देव मानत असल्याने या दिवशी वाघाची प्रतिमात्मक पूजा केली जाते. नियोजन बैठकीच्या अध्यक्षस्थानी मोलगी गावाचे माजी पोलीस पाटील रतनसिंग वसावे,मधुकर वसावे,नूरजी वसावे,रूपसिंग वसावे,मोअल्या वसावे,दामा वसावे,रामसिंग वसावे,जालमा वसावे,सागर वसावे,तानाजी वसावे, ॲड.सरदारसिंग वसावे, चंद्रसिंग वसावे,वाड्या वसावे, भीमा वसावे,उग्राण्या तडवी, नवलसिंग वसावे,त्याच प्रमाणे हा पूजा उत्सव ज्यांच्या साक्षीने व पूजा विधीने होते ते गावांतील पुजारी.नुरजी बाबा, विज्या वसावे.दमण्या वळवी, काल्या वसावे,व बारा पाड्यातील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखून शांततेत गणेश उत्सव पार पाडण्यासाठी योग्य ती पावले उचला–आमदार डॉक्टर रत्नाकर गुट्टे

### गंगाखेड शांतता समिती बैठकीत नागरिकांना केले आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**गंगाखेड । गोपाळकृष्ण पाळवदे**

गणेश उत्सव निमित्त गंगाखेड तालुका पोलीस प्रशासनाच्या वतीने आयोजित शांतता समितीच्या बैठकीस उपस्थित राहून गुट्टे साहेब म्हणाले की सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची जोरदार तयारी चालू आहे. गंगाखेड शहरासह ग्रामीण भागात सुद्धा यंदा गणेश उत्सव मोठ्या उत्साह साजरा होणार आहे. त्यामुळे सर्व गणेश भक्तांचा उत्साह खरोखर द्विगुणीत झालेला आहे. मात्र या निमित्ताने प्रशासनाची जबाबदारी ही वाढली आहे. गणेश मंडळांना पोलीस स्टेशन द्वारे देण्यात येणाऱ्या परवानग्या, पेंडॉलसाठीची लाईट जोडणी यांसह अनेक बाबी महत्त्वाच्या असून गणेश मंडळांना येणाऱ्या अडचणीचे निवारण करून त्यांच्या समस्या सोडविणे आवश्यक आहे तसेच नेहमीप्रमाणे यंदाचाही गणेशोत्सव उत्साहात व शांततेत संपन्न व्हावा हीच




प्रत्येकाची इच्छा असते याच अनुषंगाने तालुका पूल पोलीस प्रशासनाच्या वतीने गणेश उत्सव निमित्त शांतता समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसीलदार उषाकिरण शृंगारे, पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्यासह शहरातील व्यापारी तालुका प्रशासनातील सर्व कर्मचारी पोलीस बांधवांसह तालुक्यातील सर्व गणेश मंडळाचे पदाधिकार, कार्यकर्ते आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## जीडीपी वाढीभोवतीचे संशयधुके

कोशमूलो हि राजेति प्रवादः सर्वलौकिकः वरील संस्कृत सुभाषिताचा अर्थ असा आहे की, 'राजा किंवा राज्याचे अस्तित्व हे त्याच्या तिजोरीवर, म्हणजेच आर्थिक शक्तीवर, अवलंबून असते, हा जगप्रसिद्ध नियम आहे.' आता कोणत्याही देशाची आर्थिक शक्ती ही तो देश दर वर्षी स्वतःच्या भौगोलिक सीमेमध्ये किती प्रमाणात अंतिम वस्तू व सेवांचे उत्पादन करतो, यावर ठरविली जाते. यालाच सकल देशांतर्गत उत्पादन, म्हणजेच 'ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट' किंवा 'जीडीपी', असे म्हटले जाते. जीडीपीत दर वर्षी होणारी वाढ हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे आरोग्य आणि विकास दर्शविणारे एक मुख्य मापक आहे.३१ ऑगस्ट २०२६ रोजी भारताच्या सांख्यिकी मंत्रालयाने २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीसाठी जो जीडीपी डेटा प्रसिद्ध केला, त्यानुसार चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीत, गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत, भारताच्या वास्तविक जीडीपीत ७.८ टक्के एवढी वाढ झाली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ७.० टक्के या अंदाजापेक्षा, तसेच बाजार-विश्लेषकांच्या ६.९ टक्के ते ७.१ टक्के या अंदाजापेक्षा प्रत्यक्षातील वाढ कितीतरी अधिक नोंदविली गेली. खरे तर पहिल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेपुढे कितीतरी गंभीर आव्हाने होती. पश्चिम आशियाई भागातील ताणतणाव, भडकलेल्या कच्च्या तेलाच्या किमती, पुरवठा-साखळीत निर्माण झालेले अडथळे, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढती अनिश्चितता व त्याचा निर्यातीवर होऊ शकणारा विपरीत परिणाम, यावर्षीचा विलंबित पावसाळा व नंतर पडलेल्या पावसाचे विषम वितरण अशा अनेक समस्या होत्या. या समस्यांचा विचार करून, तसेच 'उच्च वारंवारता निर्देशांकां'नी पहिल्या तिमाहीचे जे चित्र दाखविले होते ते लक्षात घेऊन - जसे की खालावलेले उत्खनन, मंदावलेली वीज-निर्मिती, जीएसटी ई-वे बिल्समधील घट, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढलेली तूट, रुपयाचे अवमूल्यन इत्यादी - रिझर्व्ह बँकेने तसेच बाजार-विश्लेषकांनी पहिल्या तिमाहीतील आर्थिक वाढीविषयी सावधपणे अंदाज केले होते. त्यामुळेच पहिल्या तिमाहीसाठीच्या डेटामधून जेव्हा सणसणीत वाढलेला जीडीपी दिसून आला, तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. अनेकांनी संशयाची सुई रोखायला सुरुवात केली.त्यात २०२६ या वर्षाच्या सुरुवातीलाच भारताने जीडीपी मोजण्याच्या पद्धतीत काही ठोस बदल केले आहेत; जसे की २०११-१२ या वर्षाऐवजी २०२२-२३ हे वर्ष आता आधारवर्ष म्हणून वापरण्यास सुरुवात केली आहे. तसेच या नवीन प्रणालीत किंमत-बदलातील जुळवणी स्वतंत्रपणे उत्पादनाच्या मूल्यासाठी आणि कच्च्या मालाच्या खर्चासाठी केली गेली आहे. त्यासाठी नव्याने बनविण्यात आलेला 'उत्पादक किंमत निर्देशांक' वापरण्यात आला आहे, ज्यात अधिक मोठ्या संख्येने घटक उत्पादने समाविष्ट केली गेली आहेत.मात्र यापूर्वी जेव्हा केव्हा सरकारने जीडीपी मापनाची प्रणाली बदलली होती, तेव्हा त्यासोबत संपूर्ण 'स्त्रोत आणि पद्धती' दस्तऐवज प्रसिद्ध केला होता; पण यावेळी तसे केलेले नाही. त्यामुळे जीडीपी मापनात केलेल्या सुधारणांचे बारकावे अभ्यासकांना समजून घेता आले नाहीत. यामुळे प्रणब सेन यांच्यासारखे तज्ज्ञदेखील, जे भारताचे पहिले प्रमुख सांख्यिकी अधिकारी होते, नाराज झाले आहेत. त्यांच्या मते, दोन दशकांहून अधिक काळ भारतातील सांख्यिकी तज्ज्ञांनी 'उत्पादक किंमत निर्देशांक' बनविण्यासाठी खर्च केला होता; पण उत्पादकांकडून कधीच हवा असलेला उत्पादक-किमतींचा डेटा मिळाला नव्हता. कारण ते उत्पादकांचे एक प्रकारे 'ट्रेड सीक्रेट' असते. तसेच उत्पादक उत्पादित वस्तू निरनिराळ्या वितरकांना निरनिराळ्या किमतींना विकत असतात. त्यामुळे त्या किमतींची सरासरी मिळणे गरजेचे असते. सेन यांच्या मते, ही सर्व माहिती कशी गोळा केली गेली आहे, यावर सरकारने प्रकाश टाकणे गरजेचे आहे. एकाएकी उत्पादक सहकार्य कसे करू लागले, असा प्रश्न ते उपस्थित करतात. तसेच जुने व नवे उत्पादक किंमत-विषयक निर्देशांक काही वर्षांसाठी एकत्रितपणे प्रकाशित केले पाहिजेत, जेणेकरून अभ्यासकांना त्यांच्यातील नेमका फरक समजून घेता येईल. कच्च्या मालासंबंधीची सांख्यिकीही प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. कच्च्या मालासंबंधीचा डेटा वापरता येण्यासाठी संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी 'पुरवठा व वापर तक्ता' उपलब्ध असणे गरजेचे असते. गेल्या काही वर्षांत हे कामदेखील थांबविण्यात आले आहे. असे अनेक महत्त्वाचे मुद्दे भारताचे पहिले प्रमुख सांख्यिकी अधिकारी प्रणब सेन यांनी मांडले आहेत.भारताचे भूतपूर्व प्रमुख सरकारी अर्थतज्ज्ञ अरविंद सुब्रमण्यन यांनी हा प्रश्न 'विश्वासाच्या कमतरते'चा असल्याचे प्रतिपादन केले आहे. अनेक वर्षे जनगणना न होणे, अचानकपणे 'उपभोगासंबंधित सर्वेक्षण' मागे घेण्यात येणे, कोविड तसेच नोटाबंदीच्या काळातील आर्थिक परिस्थितीचे योग्य प्रकारे मूल्यमापन न होणे, विशेषतः अनौपचारिक क्षेत्रासाठी, अशी अनेक कारणे या 'विश्वासाच्या कमतरते'मागे असल्याचे ते अधोरेखित करतात.आता नव्या पद्धतीने मोजण्यात आलेल्या प्रत्यक्ष जीडीपी सांख्यिकीकडे बघू. नव्या आधारवर्षाच्या संदर्भात, गेल्या वर्षीच्या तुलनेत भारताचा पहिल्या तिमाहीतील वास्तविक जीडीपी निश्चितच ७.८ टक्क्यांनी वाढलेला आहे. पहिल्या तिमाहीतील एकूण आर्थिक वाढ समाधानकारक होती, हे काही उच्च वारंवारता निर्देशांकांमधूनही दिसून आले आहे. उदाहरणार्थ, एकूण निर्यातीमधील वाढ - १६.१ टक्के वार्षिक वाढ; बँकांच्या क्रेडिटमधील वाढ - १८.१ टक्के वार्षिक वाढ; स्वयंचलित वाहनांच्या विक्रीतील वाढ - २५.९ टक्के वार्षिक वाढ; टिकाऊ उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातील वाढ - सुमारे ८.० टक्के वार्षिक वाढ इत्यादी. यातून एवढे तरी निश्चितपणे म्हणता येते की भारतीय अर्थव्यवस्थेतील काही क्षेत्रांची वाढ समाधानकारकपणे होत आहे आणि पहिल्या तिमाहीतील आर्थिक आव्हाने लक्षात घेता या क्षेत्रांची लवचिकता निश्चितपणे सुधारलेली आहे.

## टी.सी हरवला आहे

वाघमारे मनिषा दगडू रा.माळेगाव, ता केज, जि बीड, येथील रहिवासी असून त्याचा संभाजीराव बडगीरे मा. व उच्च मा विद्यालय, ममदापुर ता.अंबाजोगाई १२ वी पासचा टि.सी. व १०वी, १२वी ची गुणपत्रक व दि.११ सप्टेंबर २०२६ रोजी केज ते बीड बस प्रवासा दरम्यान हरवला आहे. तरी सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधा. ८०५५४४१०५२.

# तहसील कार्यालया समोर बेकायदेशीर फेरफार रद्द करण्याच्या मागणी साठी ओमहरी ढाकणे यांचे कुटुंबीयांसह उपोषण

दैनिक वादळ वार्ता
**केज । रमेश गुळभिले**

जमिनीच्या नोंदीमध्ये करण्यात आलेला कथित बेकायदेशीर फेरफार रद्द करून न्याय मिळावा,या मागणीसाठी ओमहरी ढाकणे यांनी आपल्या कुटुंबीयांसह तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू केले आहे.संबंधित फेरफाराबाबत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.ढाकणे यांच्या म्हणण्यानुसार,त्यांच्या मालकी हक्काशी संबंधित जमिनीच्या अभिलेखात फेरफार करण्यात आला आहे. हा फेरफार नियमा नुसार व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यामुळे सदर फेरफार तातडीने रद्द करून पूर्वीप्रमाणे जमिनीची




नोंद कायम ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.या प्रकरणी संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडे अर्ज, निवेदने तसेच तक्रारी करूनही अद्याप समाधानकारक तोडगा निघालेला नाही. त्यामुळे अखेर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कुटुंबीयांसह उपोषण करण्याचा निर्णय घेतल्याचे ढाकणे यांनी सांगितले.

**फेरफाराची चौकशी करण्याची मागणी**

सदर फेरफार कोणत्या आधारे करण्यात आला त्यासाठी कोणती कागदपत्रे सादर करण्यात आली आणि महसूल विभागाकडून कोणती प्रक्रिया राबविण्यात आली, याची सखोल चौकशी करण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच फेरफार प्रक्रियेत अनियमितता आढळल्यास संबंधितां वर नियमानुसार कारवाई करावी,अशी ही मागणी उपोषण कर्त्यांनी केली आहे.

**प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष**

या उपोषणामुळे संबंधित महसूल विभागाने प्रकरणाची तातडीने दखल घेऊन कागदपत्रांची तपासणी करावी आणि वस्तुस्थिती स्पष्ट करावी,अशी मागणी होत आहे.न्याय मिळे पर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार ओमहरी ढाकणे व त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाचे लोककला स्पर्धेत यश,दिंडी नृत्यात तृतीय तर लोकगीत गायनात उत्तेजनार्थ पारितोषिक

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड येथे दि.१२सप्टेंबर २०२६ रविवार रोजी बाल रंगभूमी परिषद, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जल्लोष लोककलेचा २०२६ -२७ या स्पर्धेत साने गुरुजी निवासी प्राथमिक विद्यालय, केजच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.या स्पर्धेत विद्यालयाच्या संघाने पारंपरिक दिंडी नृत्य सादरीकरणात तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पारंपरिक दिंडी नृत्याने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकून घेतली.तसेच लोकगीत गायन स्पर्धेत 'चैत्र पौर्णिमेची रात' हे लोकगीत सादर करून संघाने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले.

दिंडी नृत्याचे दिग्दर्शन कु.साक्षी कराड, कुलकर्णी मॅडम आणि श्रीमती शेख मॅडम यांनी केले.तसेच श्री. जाधवर सर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य लाभले.या यशाबद्दल विजयी



विद्यार्थी,मार्गदर्शक व शिक्षकांचे संस्थाध्यक्ष अड.उद्धवराव कराड, उपाध्यक्ष राजेश कापसे सर आणि प्राचार्य डॉ.कविताताई गिते-कराड यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.साने गुरुजी निवासी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोककलेच्या माध्यमा तूनआपल्या संस्कृतीचे जतन करत मिळवलेले हे यश विद्यालयाच्या शैक्षणिक,सांस्कृतिक वाटचालीत मानाचा तुरा ठरला आहे.

# डॉ.सौ.प्रतिभाताई थोरात यांच्या संकल्पनेतून सारणी (आ) येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

डॉ.प्रतिभाताई अशोकराव थोरात शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप दि.११ सप्टेंबर २०२६ शुक्रवार रोजी जिल्हा परिषद शाळा सारणी (आ) याठिकाणी स्कूल बॅग वाटपाचा कार्यक्रम पार पडला.यावेळी कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजी वामनराव सोनवणे हे होते तर प्रमुख पाहुणे पृथ्वीराज पाटील शिवसेना तालुकाप्रमुख केज,युवा सेना तालुका प्रमुख दत्तकुमार काकडे,उप तालुका प्रमुख महेंद्र चाटे, तालुका सचिव विकास काशीद,सारणी गावचे उपसरपंच रवी सोनवणे,शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष जनार्दन सोनवणे,शालेय समितीचे उपाध्यक्ष काशिनाथ गायकवाड, गोकुळ सोनवणे, लिंबराज सोनवणे, जनार्दन सोनवणे, रामराव सोनवणे, बालासाहेब सोनवणे, विशाल सोनवणे , कदम मॅडम व या कार्यक्रमाचे आयोजक देविकांत सोनवणे तसेच सारणी शाळेच्या शिक्षिका मोठे मॅडम यांना स्व.केशवराव नाळवंडीकर आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल केज तालुका शिवसेनेच्या वतीने व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा देखील सत्कार करण्यात आला.शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड सर यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले यावेळी सर्व विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तसेच शाळेचे मुख्याध्यापक यांनी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख डॉ.सौ. प्रतिभाताई थोरात व सर्व शिवसेना टीमचे आभार व्यक्त केले. तसेच तालुक्यातील बऱ्याच जिल्हा परिषद शाळेमध्ये हे उपक्रम राबवले आहेत व येणाऱ्या काळात देखील असे उपक्रम राबवून सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलां साठी शाळेत साहित्य उपलब्ध करून देणार आहे असे डॉ.सौ. प्रतिभाताई थोरात यांनी सांगितले आहे.

# ओंकारेश्वर महादेव मंदिरात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची उत्साहात सांगता

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

पवित्र श्रावण मासानिमित्त लोहा शहरातील शिवकल्याण नगर येथील श्री ओंकारेश्वर महादेव मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. भागवताचार्य ह.भ.प. श्री सखाराम महाराज पालमकर यांच्या गोड व रसाळ वाणीतून संपन्न झालेल्या या ज्ञानयज्ञ सोहळ्याचा लोहा शहर व परिसरातील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने लाभ घेतला.

या सोहळ्याच्या सांगता दिनानिमित्त सूर्यवंशी कुटुंबीयांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लोहा शहर परिसरातील भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाच्या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक विचार, भक्ती, संस्कार आणि जीवनमूल्यांची प्रेरणा मिळाली. भागवताचार्य ह.भ.प. श्री सखाराम महाराज पालमकर यांनी आपल्या प्रवचनातून भागवत धर्माचे महत्त्व विशद करताना सूर्यवंशी कुटुंबीयांच्या धार्मिक कार्यातील योगदानाचे विशेष कौतुक केले. लोहा शहरातील सूर्यवंशी कुटुंब हे धार्मिक कार्यात नेहमीच मोठे योगदान देत असून, त्यांच्या माध्यमातून विविध धार्मिक उपक्रमांना चालना मिळत असल्याचे प्रतिपादन भागवताचार्य ह.भ.प. श्री सखाराम महाराज पालमकर यांनी यावेळी केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन श्री ओंकारेश्वर महादेव मंदिर सेवा समिती, शिवकल्याण नगर, लोहा यांच्या वतीने करण्यात आले होते. मंदिर सेवा समिती, सूर्यवंशी कुटुंबीय आणि सहकार्य करणाऱ्या सर्व भाविकांच्या योगदानामुळे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा यशस्वीपणे संपन्न झाला.

# शिक्षणाची दारं उघडली; पण चिमुकली मुलं राहिली उघड्यावरच

## अवहेलना : कागदावर जागेची अडचण, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रविंद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील सरी-गौरीखालपाडा येथे उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून २०२१ पासून जिल्हा परिषदेची पहिली ते चौथीपर्यंतची शाळा सुरू करण्यात आली. मात्र, पाच वर्षांचा कालावधी उलटूनही शाळेची इमारत उभी राहिलेली नसल्याने ३५ ते ४० विद्यार्थी आजही उघड्यावर अथवा घराच्या ओट्यावर शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे शाळेच्या इमारतीसाठी शेतकरी दीपक ओल्या वसावे यांनी जागा उपलब्ध करून दिली असतानाही प्रशासनाने माहितीच्या उत्तरात जागेची अडचण असल्याचे नमूद केल्याने पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.शाळेच्या वर्गखोल्यांच्या बांधकामाला २०२५ मध्ये मंजुरी देऊन मार्च २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, संबंधित ठेकेदाराने प्रत्यक्ष काम सुरूच केले नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. जागेची अडचण



दूर न झाल्याने निधी वापराची मुदत संपली आणि बांधकाम होऊ शकले नाही, असे प्रशासनाकडून सांगण्यात आल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. शाळेसाठी जागा दिल्याने मालकाने त्या ठिकाणी शेतीही केली नाही; आजही जागा पडीक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.विद्यार्थ्यांच्या मूलभूत शैक्षणिक हक्कांशी खेळ करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकावे आणि शाळेचे बांधकाम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी माजी जि.प. सभापती सी.के. पाडवी, दीपक ओल्या वसावे, धिरसिंग रामा वसावे व नारिंगी लालसिंग वसावे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. ठेकेदाराला कायदेशीर नोटीस बजावूनही उत्तर न मिळाल्याचा तसेच कार्यारंभ आदेशातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना हक्काची शाळा कधी मिळणार, असा सवाल आता पालक व ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

# केज येथे बामसेफचा केडर कॅम्प संपन्न




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

रविवार दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रोजी बामसेफ या राष्ट्रीय संघटनेचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबीर भोसले ब्रिलीयन्स क्लासेस,सभागृह केज येथे मान्यवर हनुमंत भोसले सर,शिवाजी दादा ठोंबरे,बाबुराव गालफाडे सर,प्रदीप बनसोड सर,प्रशिक्षक दिपक इंगळे पाटील राज्य अध्यक्ष राष्ट्रीय किसान मोर्चा,अशोक रोडे,इरफान पठाण, अनिल लोखंडे, रामदास वैरागे, नागनाथ लोखंडे, माऊली गालफाडे, ईत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थित तसेच नायगाव,पैठण, युसूफ वडगाव,मांग वडगाव येथील असंख्य शेतकरी, कामगार यावेळी हजर होते.

# तांबवा येथे गुणवंतांचा नागरी सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील तांबवा येथे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ कविता उद्धव कराड , एम बी बी एस साठी निवड झालेले नितीन विलास कोल्हे,सोमनाथ सुरेश पवार,प्रथमेश चिंतामण कराड यांचा नागरी सत्कार सोमवार रोजी करण्यात आला.अंबाजोगाई चे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे,उपसभापती डॉ वसुदेव नेहरकर,भाजपचे तालुकाध्यक्ष भगवान केदार,हनुमंत भोसले,डॉ हनुमंत सौदागर, महादेव सूर्यवंशी,दत्तात्रय चाटे, आदींच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना नंदकिशोर मुंदडा म्हणाले आई वडिलांच्या कष्टाची जाणीव असलेले विद्यार्थी यश मिळवतात.अत्यंत



बिकट परिस्थिती असून सामान्य कुटुंबातील गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना मदतीसाठी आम्ही तत्पर आहोत. यावेळी बोलतांना डॉ कराड म्हणाल्या पुरस्काराच्या कौतुकाची थाप काम करण्यासाठी बळ देते.गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी वाहून घेऊन काम करत राहील.गावचा सत्कार आनंद देणारा आहे असे मत व्यक्त केले. अंकुश इंगळे म्हणाले तांबवा गावाने अनेक क्षेत्रात नाव उंचावले आहे. भोसले म्हणाले गावच्या मातीत सत्कार ही बाबा गौरवपूर्ण आहे.असे मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरुण चाटे,सदाशिव चाटे,शिवाजी चाटे,दिनकर चाटे, दत्ता चाटे, अशोक चाटे, बालासाहेब कांदे, श्रीधर कराड आदींनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्षावासातून ज्ञान आणि प्रबोधनाची वाटचाल

## माजलगावात 'मिलिंद प्रश्न'च्या माध्यमातून धम्मचिंतनाचा जागर

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । विजय डावरे**

वर्षावासानिमित्त त्रिरत्न बौद्ध महासंघ, माजलगाव यांच्या वतीने स्वामी विवेकानंद नगर, मंजरथ रोड येथील कौशांबी निवास येथे 'मिलिंद प्रश्न' या ग्रंथाचे नियमित सामूहिक वाचन सुरू आहे. यंदा या उपक्रमाचे तिसरे वर्ष असून, धम्मचारी अमोलरत्न व धम्मचारी मंजूरक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली राजा मिलिंद आणि भंते नागसेन यांच्या प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून बुद्धधम्मातील तत्त्वज्ञान, प्रज्ञा, चिकित्सक विचार व सम्यक दृष्टीचे चिंतन केले जात आहे.



ग्रंथवाचनासोबतच मागील सुमारे ४५ दिवसांपासून दररोज सकाळी आनापानसती ध्यान व सायंकाळी मैत्रीभावना साधना घेतली जात आहे. बुद्धवंदना, पाली गाथा, सूत्रसंगायन तसेच विविध बौद्धिक व प्रबोधनपर उपक्रमांमुळे वर्षावासाचे वातावरण धम्ममय झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या २२ प्रतिज्ञा, बोधिसत्त्वांच्या प्रतिज्ञा, युवकांसाठी रोजगार व स्पर्धा परीक्षांबाबतही जागृती केली जात आहे.
या उपक्रमात त्रिरत्न बौद्ध महासंघातील धम्ममित्र बंधू-भगिनींसह धम्मसहाय्यक उपासिका आशाताई सिरसट, प्रा. वत्सलाताई भिसे व नालंदा चांदमारे यांचे सहकार्य लाभत आहे. ग्रंथवाचनातून धम्मबोध, ध्यानातून चित्तशुद्धी आणि प्रज्ञेतून सम्यक दृष्टी विकसित करून समतामूलक, विवेकनिष्ठ व करुणामय जीवनपद्धतीचा अंगीकार करण्याचा विधायक प्रयत्न या वर्षावासातून केला जात आहे.

# सम्राट मिहिर भोज जयंती व गुर्जर गौरव दिवस शहाद्यात उत्साहात साजरा

## शौर्य व पराक्रमाच्या वारशाचे स्मरण

दैनिक वादळ वार्ता
**दिपक गोसावी । नंदुरबार**

शहादा येथे गुर्जर-प्रतिहार राजवंशाचे महान व पराक्रमी सम्राट मिहिर भोज यांच्या जयंतीनिमित्त तसेच गुर्जर गौरव दिवसाचे औचित्य साधून अखिल भारतीय गुर्जर महासभेच्या वतीने विविध कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी सम्राट मिहिर भोज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून पुष्पहार अर्पण करत आदरांजली वाहण्यात आली. सम्राट मिहिर भोज यांनी इ.स. ८३६ ते ८८५ या कालखंडात केलेल्या राज्यकारभाराचा आणि त्यांच्या शौर्य, पराक्रम व राष्ट्ररक्षणाच्या कार्याचा यावेळी गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. त्यांच्या गौरवशाली इतिहासातून नव्या पिढीने प्रेरणा घेऊन शिक्षण, सामाजिक



एकोपा, प्रगती व राष्ट्रनिष्ठेला प्राधान्य द्यावे, असा संदेश उपस्थितांनी दिला. अखिल भारतीय गुर्जर महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास राष्ट्रीय महामंत्री सुनील पाटील, महामंत्री जगदीश पटेल, समाजश्रेष्ठी जयश्री पाटील, शहादा नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा माधवी पाटील, युवा राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. प्रफुल्ल पाटील यांच्यासह समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऐतिहासिक वारशाचे जतन, सामाजिक एकता आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संघटितपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. इतिहासाचा अभिमान, वर्तमानाची जबाबदारी आणि उज्ज्वल भविष्याचा संकल्प या भावनेतून कार्यक्रमाचा उत्साहात समारोप झाला.

# शिस्तीचा ताल अन् लेकींचा जोश! तळोद्यात कन्या विद्यालयाच्या लेझीम पथकाने वेधले लक्ष



दैनिक वादळ वार्ता
**दिपक गोसावी । नंदुरबार**

तळोदा येथील गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर काढलेल्या शिस्तबद्ध व आकर्षक लेझीम संचलनाने तळोदेकरांचे लक्ष वेधून घेतले. बिरसा मुंडा चौकापासून सुरू झालेल्या या संचलनातून बसस्थानक परिसर, स्मारक चौक, आनंद चौक व खान्देशी गल्ली या प्रमुख मार्गांवर इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थिनींनी लेझीमच्या तालावर उत्स्फूर्त सादरीकरण केले. ढोल-ताशांच्या गजरात लेकींच्या जोशपूर्ण सादरीकरणामुळे शहरातील गणेशोत्सवाच्या उत्साहात भर पडली. विद्यार्थिनींमधील शिस्त, एकता व सांघिक भावना यांचे सुंदर दर्शन या संचलनातून घडले. मुख्याध्यापक मिलिंद धोदरे यांच्या मार्गदर्शनाखाली व दिलीप तडवी यांच्या नेतृत्वाखाली संचलनाचे नियोजन करण्यात आले. सांस्कृतिक विभाग प्रमुख वैशाली देवरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष चेतन पवार, संचालक महेश मगरे, उपाध्यक्ष प्रतिभा मगरे, मेघा पवार व समन्वयक निमेश सूर्यवंशी यांनी विद्यार्थिनी व मार्गदर्शकांचे कौतुक केले.

# माळेगाव येथे दुचाकी अपघातात एक जण ठार तर एक जण गंभीर जखमी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

अंबाजोगाई-कळंब महामार्गावरील माळेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शनिवार दि.१२ सप्टेंबर रोजी पहाटे २ वाजण्याच्या दरम्यान दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक देऊन झालेल्या अपघातात दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाला,असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.किसन नवनाथ ढगे वय ३१ आणि सलीम जैनुद्दीन शेख वय २५,दोघेही रा. भोपा,ता.धारूर हे एम एच २६ ए एल ५१५७ क्रमांकाच्या दुचाकी वरून अंबाजोगाई येथे दवाखान्यात असलेल्या मित्राला भेटण्यासाठी गेले होते. तेथून गावी परत जात असताना रस्ता चुकल्याने ते अंबाजोगाई - कळंब मार्गावर आले होते. पावसात माळेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता ओलांडताना त्यांच्या दुचाकीची अज्ञात वाहनाशी जोरदार धडक लागून झालेल्या अपघातात किसन ढगे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला तर सलीम शेख यांच्या डोक्यालाही गंभीर दुखापत झाली आहे.अपघाताची माहिती मिळताच माळेगाव येथील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेवुन जखमी सलीम शेख यांना अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान,युसुफवडगाव ठाण्याच्या पोलिसांनी अपघाताचा तपास सुरू केला आहे.अज्ञात वाहनाचा शोध घेण्यात येत असून अद्याप पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आलेला नसल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी दिली आहे.



# बोरद नगरीत ढोल-ताशांच्या गजरात बाप्पाचे आगमन

दैनिक वादळ वार्ता
**बोरद । दीपक गोसावी**

विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाने बोरद नगरी भक्तिमय आणि चैतन्यमय झाली. दि. १२ रोजी सायंकाळी पाच वाजता विविध गणेश मंडळांच्या गणरायांचे ढोल-ताशांच्या गजरात व जयघोषात उत्साहात आगमन झाले. गावातील मुख्य मार्गावरून तब्बल तीन तास चाललेल्या या भव्य मिरवणुकीत शेकडो नागरिक, महिला व तरुण मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यंदा गावात सार्वजनिक व घरगुती मिळून सुमारे १५ ते २० गणरायांचे आगमन झाले. गुरुदत्त, जय बजरंग, रायबा, गौरीपुत्र गौरी, सार्वजनिक, वीर एकलव्य, शिवानंद, नवयुग, भगवे वादळ तसेच बोरद ग्रामस्थ मंडळाच्या गाव गणपतीसह विविध मंडळांनी वाजत-गाजत सहभाग नोंदविला.




ढोल-ताशांचा निनाद, बँडच्या सुरावटी आणि गणरायाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मोठी गर्दी असूनही मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी दाखविलेल्या संयमामुळे मिरवणूक शांततापूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. गणरायांचे मंडपात आगमन झाल्यानंतर बोरदवासीयांमध्ये उत्साहाचे वातावरण असून आगामी गणेशोत्सवासाठी संपूर्ण गाव सज्ज झाले आहे.

# बोरदमध्ये गणेशोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**दिपक गोसावी । नंदुरबार**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बोरद पोलीस दूरक्षेत्रात उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये यांच्या अध्यक्षतेखाली १३ रोजी शांतता कमिटीची बैठक पार पडली. यावेळी बोरदसह आष्टे व मोड परिसरातील गणेश मंडळांचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत उत्सव शांततेत व उत्साहात साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

बैठकीत बोरद येथील गणेश विसर्जन पाचव्या दिवशी करावे की सातव्या दिवशी, यावर गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांकडून वेगवेगळ्या मागण्या मांडण्यात आल्या. काही मंडळांनी सालाबादप्रमाणे पाचव्या दिवशी विसर्जनाची मागणी केली, तर काही मंडळांनी सातव्या दिवशी विसर्जनास परवानगी देण्याची मागणी केली. याबाबत एकमत न झाल्याने अंतिम निर्णय वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार असून, वरिष्ठांकडून होणारा निर्णय सर्व गणेश मंडळांना बंधनकारक राहील, असे पोलीस निरीक्षक राजन मोरे यांनी स्पष्ट केले.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये यांनी गणेश विसर्जन मिरवणूक ठरवून दिलेल्या मार्गानेच काढावी, मिरवणुकीत मद्यपान करू नये, उत्सवाला गालबोट लागेल असे कोणतेही कृत्य करू नये तसेच विसर्जन प्रक्रिया सायंकाळी पाच वाजेपूर्वी पूर्ण करावी, अशा सूचना दिल्या. प्रत्येक मंडळाने स्वयंसेवकांची नेमणूक करून प्रशासनाला सहकार्य करावे आणि गावाची शांतता व सामाजिक सलोखा कायम ठेवत गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

बैठकीस माजी जिल्हा परिषद सदस्य नरहर ठाकरे, माजी सरपंच सुकलाल ठाकरे, रवींद्र भिलाव, उपसरपंच संतोष ढोडरे, ग्रामपंचायत सदस्य साजन शेवाळे, दत्तू ठाकरे, माजी ग्रामपंचायत सदस्य मंगेश पाटील, दयानंद चव्हाण, भाऊराव बिरारे, गुलाबसिंग गिरासे, मोडचे पुंडलिक राजपूत, माजी सरपंच रणजीत वळवी, कुणाल पाडवी यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. बैठक यशस्वी करण्यासाठी बोरद दूरक्षेत्राचे असिस्टंट सब इन्स्पेक्टर प्रकाश अहिरे, भीमसिंग ठाकरे व हेड कॉन्स्टेबल देवीदास वळवी यांनी परिश्रम घेतले. शांतता कमिटीची बैठक खेळीमेळीच्या व सकारात्मक वातावरणात पार पडली.



# पिराचीवाडी येथे एक गाव एक गणपती चा एकमताने निर्णय

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील पिराचीवाडी येथे या वर्षांपासून सुरु करण्यात आलेली एक गांव एक गणपती हिच परंपरा गणपतीचा आदर्श ग्रामस्थ आता जोपासत आहेत.गणेश उत्सवासोबतच प्रत्येक सार्वजनिक उत्सवात जातीय सलोखा राखला जावा.गावात एकोपा निर्माण व्हावा, शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी एक गाव एक गणपतीचा उपक्रम राबविण्याचा प्रयत्न पिराचीवाडी ग्रामस्थांच्या पुढाकाराने केला जात आहे.वडमाऊली गणेश मंडळाचे अध्यक्ष बाळू सिरसट व सतीश कराड,उपाध्यक्ष अमोल कराड,दिपक कराड,सदस्य बाबासाहेब सिरसट, जीवन सिरसट, गहीनीनाथ सिरसट, देवा कराड,अरुण कदम,सरपंच विनोदास यादव,उप सरपंच बी.एस कराड व बाळू सिरसट यांच्या मार्गदर्शनाखाली एक गाव एक गणपतीची संकल्पना साकारली जात आहे.एक गाव एक



गणपतीच्या माध्यमातून केज तालुक्यातील पिराचीवाडी येथील ग्रामस्थांनी नविन आदर्श समाजापुढे ठेवला आहे.

# कागदावरच राहिली मदत,केज तालुक्यातील मौजे रामेश्वरवाडी येथे सोयाबीन नुकसानीचे केवळ पंचनामे; शेतकरी भरपाईच्या प्रतीक्षेत

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरी कडे प्रशासनाची दिरंगाई,अशा दुहेरी संकटात मौजे रामेश्वर वाडी येथील शेतकरी पार कोलमडून गेला आहे.सततचा खंड, हवामानातील बदल आणि ऐन हंगामात निसर्गाने दिलेला दगा यामुळे परिसरातील सोयाबीनचे पीक पूर्णपणे वाळून जळून खाक झाले आहे. पिकाची झालेली दयनीय अवस्था पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळत आहेत.

**शासकीय यंत्रणांकडून पंचनाम्याचा फार्स**

नुकसानीची पाहणी करण्यासाठी नुकतेच मौजे रामेश्वर वाडी येथील शेतात मंडळ अधिकारी,ग्रामसेवक, आणि कृषी सहाय्यक यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानग्रस्त सोयाबीन पिकाची पाहणी व पंचनामे केले.यावेळी स्थानिक



शेतकरीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.परंतु, दरवर्षी अधिकारी येतात,पाहणी करतात, फोटो काढतात अन् पंचनामे करून निघून जातात,पण प्रत्यक्ष मदत मात्र काहीच मिळत नाही,असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारत आहेत.अनुदान नाही अन् पीक विमाही मिळेना अशा अवस्थेत शेतकरी जगत आहे. आजपर्यंत केवळ कागदावरच पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. प्रत्यक्षात ना शासनाचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले, ना पीक विम्याची भरपाई मिळाली. बियाणे,खते आणि मशागतीसाठी लावलेला अतोनात खर्चही निघणे कठीण झाले आहे.कर्ज काढून पेरणी केलेल्या शेतकऱ्यांसमोर आता उदरनिर्वाहाचा आणि कर्जाची परतफेड कशी करायची,असा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे.

**निसर्गाची अवकृपा अन् प्रशासनाची उदासीनता**

यंदाच्या हंगामात निसर्गाने अजिबात साथ दिली नाही. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे,तर दुसरी कडे शासकीय यंत्रणे च्या संथ कारभारामुळे शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. केवळ पंचनाम्यांचे नाटक न करता प्रशासनाने तात्काळ पीक विमा आणि शासकीय अनुदान मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे,अशी ठाम मागणी रामेश्वर वाडी तील त्रस्त शेतकऱ्यांकडून केली जात आहे.लवकर मदत न मिळाल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

# लोककला महोत्सवात साहित्यिक रज्जाक शेख सन्मानित

दैनिक वादळ वार्ता

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी छत्रपती संभाजीनगर येथे कै.पुंजाजी बाबा बहुउद्देशीय प्रतिष्ठान छत्रपती संभाजी नगर यांच्यावतीने महाकवी वामनदादा कर्डक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संयुक्त जयंती निमित्त आयोजित लोककलावंतांचा लोककला महोत्सव व सन्मान सोहळा २०२६ उत्साहात पार पडला. छत्रपती संभाजीनगर येथील कार्यक्रमात श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथील कवी,साहित्यिक गझलकार,अभिनेते रज्जाक शेख यांनी महाराष्ट्राच्या पारंपारिक लोककला व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी केलेल्या भाषिक व सांस्कृतिक योगदानाबद्दल शाल,पुष्पगुच्छ, आकर्षक सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य समाज कल्याण मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांचे हस्ते झाले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध



समीक्षक माननीय कांबळे होते तसेच प्रमुख उपस्थितीत दुग्धविकास व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे , महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियानाचे राज्य उपाध्यक्ष श्रीराम घोडके, स्वागताध्यक्ष एकनाथराव त्रिभुवन, शाहीर अशोक बागुल,ग्रामीण कवी आनंदा साळवे, भीमशाहीर सुनील खरे, नंदकुमार खरात आदी मंडळी उपस्थित होते.शेख यांनी मराठी भाषा संवर्धन आणि संरक्षणसाठी अनेक कवीसंमेलनात जाऊन आपल्या कवितांचे सादरीकरण केले आहे.शेतीमाती आणि ग्रामीण जीवन हा त्यांचा कवितांचा मुख्य विषय. त्याचबरोबर दोन लघुपटात त्यांनी अभिनेते म्हणून अभिनय केलेला आहे.राज्यस्तराव आयोजित विविध उपक्रम आणि भाषिक सांस्कृतिक सन्मानाबद्दल विविध स्तरातून कौतुक होत आहे.

# धारावीत श्री आरती संग्रहाचे वाटप एका सुरात,एका संघात आरतीचा जागर

दैनिक वादळ वार्ता

**धारावी । प्रतिनिधी**

दिनांक १४ सप्टेंबर २०२६ पासून श्री गणेश उत्सवास सुरुवात झाली आहे. घरोघरी येणारे गणपती व कुटुंबीय तसेच गल्लीबोळातील लहान लहान मंडळांना एका संघात, एका सुरात आरती म्हणता यावी आणि एकत्र आरतीचा आनंद लुटता यावा, याकरिता साप्ताहिक 'भगवे वादळ' संचालित श्री आरती संग्रहाचे वाटप करण्यात आले.

धारावी झोपडपट्टी पोलीस पंचायत बीट नंबर दोन व धारावी नागरिक समिती यांच्या माध्यमातून आणि संपादक दत्ता खंदारे यांच्या प्रेरणेतून प्रकाशित झालेल्या या आरती संग्रहाचे वाटप सकाळी साडेदहा ते साडेबारा या वेळेत संत कक्कय्या मार्ग, धारावी येथे करण्यात आले.

कुटुंबप्रमुख व मंडळाचे प्रमुख अशा ९९ जणांना या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक दिलीप गाडेकर यांच्या उपस्थितीत व बीट प्रमुख अलका साबळे



यांच्यासह सविता शेरखाने, दामोदर शिंदे, गिरीराज शेरखाने, शंकर खिल्लारे व कवयित्री विमल बबन गजरे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.यावेळी कुटुंबासह घरगुती गणपती व गल्लीबोळातील सार्वजनिक गणपती मंडळांच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन श्रींच्या सोबत पुस्तक भेट देऊन छायाचित्र काढण्यात आले.

यावेळी संपादक दत्ता खंदारे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या श्री आरती संग्रहामुळे एकत्र आरती, एका समूहात, एका सुरात घेतली जाईल असा आशावाद मार्गदर्शक श्री. दिलीप गाडेकर यांनी व्यक्त केला. तसेच श्रीगणेशाला आम्हा सर्व धारावीकरांना चांगले आणि मोफत घर मिळो, असे साकडे यावेळी सामूहिकरित्या घालण्यात आले.

# गंगाखेड शहर आपण सर्व मिळून अतिक्रमणमुक्त करूया-मा.आ.डॉ.केंद्रे

दैनिक वादळ वार्ता

**गंगाखेड । प्रतिनिधी**

गंगाखेड मध्ये झालेल्या शांतता समिती बैठकीत बोलताना माजी आमदार डॉक्टर मधुसूदन केंद्रे यांनी सांगितले की,नगराध्यक्ष असताना माझ्या कार्यकाळात जवळपास हजार अतिक्रमण काढण्यात आले शहर अतिक्रमण मुक्त केले होते सर्वांना माहीत आहे,आज घडीला प्रत्येक व्यापारी बांधवांनी आपल्या दुकानासमोर ५ फूट अतिक्रमण केले आहे.नालीवर ओटा बांधकाम करणे,मुख्य रस्त्यालगत जाहिरात फलक लावणे यामुळे अतिक्रमण होऊन वाहतूक कोंडी होत आहे हे आपना सर्वांना माहिती आहे त्यामुळे आपण सर्वांनी मिळून अतिक्रमण मुक्त गंगाखेड शहर करण्यासाठी यापूर्वीचे हेवेदावे विसरून स्वच्छ शहर सुंदर शहर करण्यासाठी एकत्र येऊया,अतिक्रमण काढण्यासाठी स्वतः होऊन सुरुवात करूया आणि आनंदात गणेशोत्सव साजरा करूया. असे आवाहन डॉक्टर मधुसूदन केंद्रे यांनी केली

बैठकीस गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉक्टर रत्नाकर गुट्टे, नगराध्यक्ष प्रतिनिधी डॉक्टर मधुसूदन केंद्रे, गटनेते मिथिलेशभैय्या केंद्रे, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसीलदार उषा किरण शृंगारे, उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्निल राठोड, प्रभारी पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे व

शहरातील व्यापारी, गणेश मंडळाचे पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य, पत्रकार बांधव उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077